# पोलीस आयुक्तालय

## अमरावती शहर

### दैनिक दाखल गुन्हे

**दिनांक  ०७/०१/२०२४**

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| ०१ | पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर अप क्र. १०/२०२४ कलम ३२४, २९४, ५०६, ३२३, ३४ भादवि | फिर्यादीच्या घरासमोर वडाळी | दि.०५/०१/२०२४ चे २१.३० वा<br><br>दा.ता.वेळ दि.०६/०१/२०२४ चे ०२.३९ वा | संतोष वनशोभ पवार वय ३८ वर्ष, रा. मोगरा ह.मु. वडाळी | १) अक्षय तुपट, २) तेजस तुपट, ३) गोविंदा भालवी अधिक एक इसम नाव माहीती नाही | हकीकत अशा प्रकारे आहे की, मी दि.०५/०१/२०२४ रोजी रात्री ०९.३० वा शुक्रवार बाजार करुन घरी आलो तेव्हा चार जणांनी माझ्या दुचाकी गाडीवर हमला केला तेव्हा मी गाडी माझ्या घराजवळ टाकुन तेथुन गेलो कारण त्यांनी मला लाठीने मारायला सुरुवात केली होती त्यापैकी अक्षय तुपट ने मला लाठी ने मारल, त्याला मी तेथील वस्तीत खुप वेळा बघीतले म्हणुन त्याला मी ओळखतो त्याच्या सोबत त्याचा भाउ तेजस होता गोविंदा भलावी आणि एक जण त्यांच्या सोबत होता त्याचे नाव मला माहीत नाही पण चेहरा पाहील्यावर मी ओळखतो मला काठी लागली तेव्हा तेथुन पळुन मी रस्त्यावर थोड्या अंतरावर गेलो नंतर तेथेही चार जण माझे मागे आले त्यांनी मला जे करायचे ते कर असे अश्लील भाषेत शिवीगळ केली. माझा साळा प्रमोद भोसले हे मला वाचवायला आले तेव्हा त्यालाही हातावर काठीणे मारले तेव्हा वस्तीतल्या लोकांनी व मी सुध्दा त्या मुलांना पकळण्याचा प्रयत्न केला तेव्हा ते तेथुन पळुन गेले तेव्हा तेथे मला मारहाण करणारे इसम यांनी त्यांची दुचाकी गाडी आमच्या घराजवळ टाकुन पळुन गेले करिता नमुद चार इसमाविरुध्द कायदेशीर कार्यवाही करावी अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर अप क्र ११/२०२४ कलम ३२४,३२३,५०४ भादवि | सुपर एक्सप्रेस हायवे रोडवर गुणवंत महाराज मंदिराजवळ अमरावती | दि.०६/०१/२०२४ चे १२.०० वा<br><br>दा.ता.वेळ दि.०६/०१/२०२४ चे १७.३१ वा | काशीफ खान वल्द आसीफ खान वय १९ वर्ष रा. लालखडी वॉटर सप्लायर के पास अमरावती | १ राहुल २ करण ३ पिंटया + इतर इसम | हकीकत अशा प्रकारे आहे की, मी व माझा मित्र फाहाद खान वल्द फिरोज खान रा बिच्छु टेकडी अमरावती आणि माझा छोटा भाउ मुजीब खान वल्द आसीफ खान असे सुपर एक्सप्रेस हायवे रोडवर गुणवंत बाबा मंदिरा जवळ आम्ही इस्टाग्राम वर व्हिडीओ करिता शुटींग करत होतो.तेथील बाजुला असलेल्या टेकडीवर एक मुलगा व एक मुलगी आमच्या जवळ आले व आम्हाला म्हटले की तुम्ही आमचे फोटो का काढत आहे त्यावरून आम्ही त्यांना म्हटले की आम्ही इंस्टाग्राम वर रिल बनवित आहे आम्ही आमचे फोटो काढत आहे तरी तुम्ही आमचा मोबाईल चेक करा या वरून त्या मुलाने माझा मोबाईल घेतला व त्याने एका मुलाला तेथे बोलाविले व त्याच्या सोबत असणारी मुलगी तेथुन निघुन गेली दहा मिनीटाने तेथे काही मुले आले मी फोनवर बोलत होतो मला काही एक न सांगता त्यांच्यातील काही मुलांनी मला लाठीने व गोटयांनी मारहाण करायला सुरू केली माझे सोबत असणारा मित्र फाहान खान आणि माझा लहान भाउ तेथुन पळुन गेले माझे पाठीवर काठयाचे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | वळ आले, माझे् डोक्यावर बेंड आला, माझे् डाव्या पायावर मार लागला तेवढयात तेथुन रोडने जाणारा मोटरसायकल स्वार रिझवान अहमद वल्द अब्दुल फहीम रा साबणपुरा अमरावती हा माझे् मदतीला आला तर त्याला सुध्दा त्या मुलांनी मारहाण केली व त्याच्या उजव्या डोळयाला, नाकाला डाव्या हाताला मार लागला व त्याला तेथील खदान जवळ फेकुन दिले व तेथुन ते मुले पळुन जात असतांना त्यांनी राहुल, करण, आणि पिंटया असे नाव म्हणत होते व ते आम्हाला शिवीगाळ करून परिहारपुरा वडाळी कडे पळुन गेले. अशा फिर्यादीच्या जबाणि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| ०१ | राजापेठ अप क्र १६/२०२४ कलम ४९८ अ, ३४ भा.द.वी. | ज्योती कॉलनी त्रीपुर्ती नगर अमरावती. | घ.ता.वेळ - दि. २१/०३/२०२३ चे पुर्वी दा.ता.वेळ - दि. ०६/०१/२०२४ चे १३.०२वा. | महिला वय ३३ धंदा घरकाम रा. ज्योती कॉलनी अमरावती | १.पती -विक्रम शेषराव शेटे अमरावती २. सासु ३. शेषराव विठ्ठल शेटे ४.संकेत शेटे सर्व रा. वनश्री कॉलनी कांडली ता.परतवाडा जी. अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद आरोपीतांनी फि.चे चारीत्रावर संशय घेवुन तीला सतत मानसीक व शारीरीक त्रास दिला म.स.क अमरावती यांच्या अहवालावरुन व फिर्यादिचे जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |
| २ | राजापेठ अप क्र १७/२०२४ कलम ४९८ अ, ३४ भा.द.वी. | नागपुर पिंपळा फाटा साई नगर -२ निलकमल नागपुर | घ.ता.वेळ - दि. २१/०३/२०२३ चे पुर्वी दा.ता.वेळ - दि. ०६/०१/२०२४ चे १९.३४ वा. | महिला वय ३५ घरकाम रा. नागपुर पिंपळा फाटा साई नगर -२ निलकमल नागपुर ह.मु. नवाथे अमरावती | १. सतीश सौरंगपते २.सासु ३. नणंर रा. नागपुर ४. नणंद रा भोपाल ५. नणंद रा वर्धा | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद आरोपीतांनी फि.चे चारीत्रावर संशय घेवुन तीला सतत मानसीक व शारीरीक त्रास दिला म.स.क अमरावती यांच्या अहवालावरुन व फिर्यादिचे जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | बडनेरा **अप क्र.०९ /२०२४ कलम २७९, ३३७, ३३८, भादवी सहकलम १३४ मोवाका.** | **अकोला वाय पॉईट जवळ बडनेरा** | **गु. घ. ता. वेळ -दि. २१/१२/२०२३ चे १९/३५ वा.**<br><br>**दाखल वेळ - दि. ०६/०१/२०२४ चे ११/४९ वा.** | **महिला , वय ३५ वर्ष गृहिणी रा. ग्राम कुरुम ता. जि. मुर्तिजापुर , जि. अकोला** | **संदिप चिंचे ( ऑटो चालक ) वय अ. ५० वर्ष रा. लोणी** | हकीकत अशा प्रकारे आहे की दि. २१/१२/२०२३ रोजी संध्याकाळी ०७/३५ वा. च्या सुमारास आम्ही लोणी जाण्याकरिता ज्या ऑटोत बसलो त्या संदिप चिंचे (ऑटो चालक ) वय अ. ५० वर्ष रा. लोणी या ऑटोचालकाने त्याचे ताब्यातील ऑटो भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन त्याचा ऑटो अकोला वाय पॉईट जवळील दिशादर्शक फलकाच्या लोखंडी खांबाला व रोडच्या बाजुला असलेल्या लोखंडी सेफ्टी डिवायडरला ऑटोची धडक देवुन मला व माझ्या भाचीला जखमी करण्यास कारणीभुत ठरला व पळुन गेला अपघातामध्ये माझे हाताचे डावे मनगटाला व डोक्याला, डाव्या पायाच्या पोटरली मार लागुन माझ्या डाव्या हाताचे मनगट फँक्चर झाले व माझ्या भाचीला किरकोळ जखम झाली. हाच माझा जबानी रि. असुन असुन मी सांगितलेप्रमाणे संगणकावर टंकस्खीत केला वाचुन पाहिला बरोबर आहे. अशा जबानी रि वरुन व मेडी सर्टि . वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पो.स्टे. नांदगाव पेट अप क्र. ०५/२०२४ कलम २७९,३३७, ३३८ भादवी | संगमेश्वर टि.पॉईट अमरावती | दि.२५/११/२५/११/२०२३ चे रात्री ०१/३० वा.दरम्यान<br><br>दाखल ता.वेळ दि.०६/०१/२०२४ चे १८/१३ वा. | शोयब खान असद उल्लाह खान वय ४८ वर्ष रा. पॅराडॉईस कॉलनी अमरावती | सुझुकी गाडी क्र.एम एच २७ बि.झेड १९०७ चा चालक | हकीकत अशा प्रकारे आहे की,यातील फि हे नमुद घ ता वेळी व ठिकाणी फि हे नागपुरहुन अम.कडे गाडी क्र.एम एच २७ बि.ई.५१७२ येत असतांना एन.एच ६ हायवेच्या संगमेश्वर टी.पॉईट रोडवर एक मारुती सुझुकी कंपनीची गाडी क्र.एम एच २७ बि.झेड १९०७ हि नांदगावपेठ टोलनाका वरुन नागपुर कडे येत असतानां वाहनचालक यांने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन नमुद घटनास्थळी डिव्हायडरवर चढवुन फि यांची गाडीला जोरात धडक मारल्यामुळे फि च्या उजव्या छातील बरगडीला व उजव्या हाताच्या मनगटाला मार लागला .तसे च फि चे वडील असद उल्लाह खान यांना पाठीच्या फसळीला तसेच डोक्याला व पायाला मार लागला तसेच लहान भाऊ नावेद खान यांना पायाच्या पौच्याला व छातीला मुका मार लागल्याने आम्हाला टोलनाका अँब्युल्सने पि.डि.एम.सि.दवाखाना येथे नेले असता आम्ही तेथुन खाजगी डॉ.ताटेकर यांच्या दवाखान्यात उपचार घेतला आज रोजी आम्ही उपचार घेवुन संबधित डॉक्टरचे कागदपत्रे घेवुन नमुद गाडी क्र.एम एच २७ बि.झेड १९०७ या वर कारवाई व्हावी.करीता तक्रार देत आहे.अशा फि च्या जबानी रिपोर्ट व मेडी सर्टी वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | पो.स्टे. नांदगावपेट अप क्र. ०६/२०२४ कलम २७९,३३७, ३३८ भादवी | तेलाई मंगल कार्यालय जवळ समोरुन अमरावती | दि.३१/१२२०२३ चे रात्री १९/३० वा.दरम्यान दाखल ता.वेळ दि.०६/०१/२०२ ४ चे १९/५० वा. | अकिल अहमद शेख सरदार सौदागर वय ४९ वर्ष रा.हॉटेल महफिल समोर ,सिव्हील सर्जन बंगला अमरावती | पॅशन प्लस गाडी क्र.एम एच २७ ए.जि.३६८३ चा चालक चालक | हकीकत अशा प्रकारे आहे की,यातील फि हे नमुद घ ता वेळी व ठिकाणी दि.३१/१२/२०२३ रोजी आमचे मित्र श्री.काकडे लँब टेक्निशियन ,जिल्हा सामान्य रुग्णालय अम.यांचे घराचे वास्तुकचे कार्यक्रम गिरीजा विहार ,रामनगर ,अम.येथे असल्याने मी व माझा मित्र चारुदत्त सुखदेव गोंडेकर असे त्यांची होन्डा सुपर स्प्लेडर मो.सा.क्र.एम एच २७ ए.झेड.४७ ५१ ने सांयकाळी ०६/३० वा.सुमारास निघालो व मी गाडीवर मागे बसलो होतो.सायकांळी ०७/३० वा.सुमारास आम्ही शेगाव नाका रोड ते तेलाई मंगल कार्यालय रोडने जात असता तेलाई मंगल कार्यालय जवळ समोरुन एक मो.सा.वाला भरधाव वेगाने आला व समोरुन आमच्या मो.सा.धडक मारली त्यामुळे आम्ही दोघेही खाली पडलो. व ठोस मारणारा मुलगा सुद्धा खाली पडला.मला उजव्या पायाच्या घोट्यावर व उजव्या मांडीवर किरकोळ मार लागला.माझा मित्र चारुदत्त गोंडेकर याला डोक्यावर व चेहऱ्यावर गंभीर मार लागुन रक्त निघत होते.तसेच दुसऱ्या मो.सायकलवाल्याला सुद्धा डोक्यावर मार लागला.आमची दोघांची गाडीला मार लागल्यो दोन्ही गाड्या तुट- फुट झाल्या होत्या .तेव्हा मी त्यांच्या गाडीला पाहीले असता ति लाल रंगाची पँशन प्लस गाडी क्र.एम एच २७ ए.जी.३६८३ दिसली.त्या दोघांना मार लागला होता.म्हणुन मी एका आँटो रिक्षा थांबवुन त्यांना उपचारा साठी सामान्या रुग्णालय अम.येथे घेवुन गेलो असता व माझ्या मित्राला अंडमिट केले.मि दवाखान्यात कामात असताना पँशन प्लस गाडी क्र.एम एच २७ ए.जि.३६८३ चा चालक हा दवाखान्यात मला दिसला नाही.चारुदत्त गोंडेकर याला गंभीर मार असल्याने त्याचे नातेवाईकांनी त्याला त्याच दिवशी रात्री रेडियंन्ट हॉस्पीटल अम.येथे अँडमिट केले.त्याच्यावर सध्या औषधोपचार सुरु असुन तो आताही अनकाँशस कंडिशन मध्ये आहे.पँशन प्लस गाडी क्र.क्र.एम एच २७ ए.जि.३६८३ च्या चालकाने त्याची गाडी भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन आमची मो.सायकल क्र.एम एच २७ ए.झेड ४७५१ ला समोरुन ठोस मारुन अपघात केला.त्यामुळे माझा मित्र चारुदत्त गोंडेकर हे गंभिर जख्मी झाला.म्हणुन नमद चालकावर कारवाई व्हावी करीत ा तक्रार देत आहे.अशा फि च्या जबानी रिपोर्ट व मेडी सर्टी वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ४ | पो स्टे गाडगे नगर अम अप क्र. ३३/२०२ कलम २७९,४२७ भादवी | संत गाडगे बाबा समाधी मंदिर समोर अमरावती | घतावेळ ०६.०१.२०२ चे दुपारी १४.३० वा दातावेळ ०६.०१.२०२ चे १७.५६ वा | प्रेमदास रघुनाथ आठोले वय ४६ वर्ष रा. सौलानी बाबा दर्गा जवळ फॉरेस्ट कंपनी अमरावती | गाडी क्र एम एच २७ एच ९९४० चा सिटी बस चालक | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घतावेळी व ठीकाणी यातील फीर्यादी ही हे अमरावती डेपो येथुन अजनगाव सुर्जी येथे जाण्याकरिता गाडी क्र एम एच ४० वाय ५८०३ ने मालटेकळी गर्ल हायस्कुल जाऊन नेहमी प्रमाणे प्रवाशी घेणे करिता संत गाडगे बाबा समाधी समोर बस थांबा असल्याने बस थांबविली.प्रवाशी बस मध्ये चढत होते त्यावेळी अचानक बसला आरोपीचे गाडी क्र एम एच २७ एच ९९४० चा सिटी बस चालकने धडक मारली व सिटी बस चालकाने धडक मारुन फिचे गाडीचे उजव्या बफर ला मार लागुन नुकसान केले.अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| ०१ | पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर अप क्र. १२/२०२४ कलम २९४, ५०६-ब भादवि | प्रबुध्द नगर अमरावती | दि.०६/०१/२०२४ चे १७.३० वा दा.ता.वेळ दि.०६/०१/२०२४ चे २०.१४ वा | महिला वय २८ वर्ष रा प्रबुध्द नगर अमरावती | सुरज जितेंद्र तायडे रा प्रबुध्द नगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्यांच्या मुलाचा वाढदिवस असल्याने ते त्यांच्या आई यांच्या घरी हजर असतांना यातील सुरज जितेंद्र तायडे हा दारू पिवुन तेथे आला व त्यांना शिवीगाळ करू लागला तुमची पोरगी मी नेली व लग्नही केले तुम्ही काय करता असे बोलुन फिर्यादी व फिर्यादीचे आईला शिवीगाळ करू लागला व फिर्यादीच्या लहान मुलीच्या मागे धावुन मी तुम्हाला सगळयांना बघुन घेईल मी एका एकाचे हातपाय तोडुन टाकीन अशी धमकी देवुन अश्लिल शिवीगाळ केली आज सकाळी मोहल्यातील एक महिला हिला सुध्दा शिवीगाळ केली होती तिने सुध्दा त्याचे विरूध्द पोस्टेला रिपोर्ट दिले आहे तो दारू पिण्याचे सवईचा असुन आमचे परीवाराला व मोहल्याला त्याचा त्रास आहे अशाअशा फिर्यादीच्या जबाणि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| अ.क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ८ |
| १ | खो गेट ०१/२०२४ कलम १७४ जाफौ | पंजाबराव हॉस्पिटल अमरावती | शेख जमील शेख जलील वय ४० रा सागर नगर अमरावती<br>दि०५/०१/२०२४ चे २३.०० वा दाखल -दि ०६/०१/२०२४ चे ०४/४१ वा | शेख फारुक शेख जलील वय ४५ रा हैदरपुरा अमरावती | पंजाबराव हॉस्पिटल अमरावती हकीकत अशा प्रकारे आहे की आम्ही ए एसआय विजय पांडे यांची दि ०५/०१/.२०२४ चे २१.०० ते ०६/०१/२०२४ चे ०९.०० वा पावेतो ड्ी़ओ ड्युटी असतांना पंजाबराव हॉस्पिटल दवाक्खाऩा येथे कंट्रोलच्या कॉलवर गेलो असता पोलीस चौकी येथुन मेमो क्र आय पी /३९९४२ पोकाँ शकीर ब न ३१३ पोस्टे गाडगेनगर यांचे कडुन प्राप्त झाला तसेच म्रुतक नामे शेखजमील सेख जलील वय ४० रा सागर नगर अमरावती याचा भाऊ नामे शेख फाारुख शोख जलील वय ४५ रा हैदरपुरा याने माहीती दिली की त्याचे भावाचे पोटात खुप दुखत असल्याने इलाजाकरीता पंजाबराव हॉस्पिटल येथे आणले असता उपचार दरम्यान त्याचा बाऊ मरण पावला असे सांगीतले वरुन सदरचा मर्ग दाकल |